रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स, व हुतात्मा बाबू गेणू सायन्स कॉलेज,

मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.

राज्यशास्त्र विभाग

वार्षिक अहवाल- २०२५-२६

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध उपक्रम आयोजित केले. त्याबाबतचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे

भारतीय संविधान दिन साजरा

दिनांक: २६ नोव्हेंबर, २०२५

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे २६ नोव्हेंबर रोजी 'भारतीय संविधान दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन करणे आणि विद्यार्थ्यांना संविधानातील मूल्यांची जाणीव करून देणे, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नानासाहेब गायकवाड साहेब यांनी सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संविधानाच्या 'उद्देशिकेचे' (Preamble) सामुदायिक वाचन करून शपथ दिली. तसेच डॉ.बाबासाहेब तोंडे यांनी संविधानाचे महत्त्व, नागरिकांचे मूलभूत हक्क आणि कर्तव्ये यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृद्धिंगत होण्यास मदत झाली.



ANNASAHEB AWATE COLLEGE ★MANCHAR★

राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अवसरी दूध शीतकरण केंद्रास भेट

दिनांक २० फेब्रुवारी २०२६

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील राज्यशास्त्र विभागामार्फत दिनांक २० फेब्रुवारी २०२६ रोजी अभ्यास क्षेत्र भेट आयोजित करण्यात आली. या अंतर्गत विद्यार्थ्यांनी अवसरी दूध शीतकरण केंद्रास भेट देऊन तेथील व्यवस्थापन पद्धती, दूध संकलन व शीतकरण प्रक्रिया तसेच रोजगार निर्मिती यांचा अभ्यास केला. केंद्रातील अधिकाऱ्यांनी दूध संकलन, साठवणूक, शीतकरण व्यवस्था आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेत दुग्ध व्यवसायाचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कर्मचाऱ्यांशी संवाद साधत उद्योगाची कार्यपद्धती समजून घेतली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी अभ्यास क्षेत्र भेटीसाठी परवानगी व प्रोत्साहन दिले या अभ्यास भेटीदरम्यान विभाग प्रमुख डॉ. बी. एस. तोंडे आणि प्रा. सचिन पारधी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व क्षेत्राधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.



ANNASAHEB AWATE COLLEGE
MANCHAR

शैक्षणिक जागृतीसाठी गृहभेटी चे आयोजन

अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील राज्यशास्त्र विभागामार्फत शुक्रवार दिनांक २८/११/२०२५ ते २९/११/२०२५ मंचर,अवसरी,जारकरवाडी,पिंगलवाडी,नारोडी,वडगाव काशिंबेग.) शैक्षणिक जागृतीसाठी गृहभेटी चे आयोजन करण्यात आले होते .उत्तर पुणे जिल्ह्यातील एक नामांकित महाविद्यालय म्हणून अण्णासाहेब आवटे महाविद्यालय परिचित आहे. तसेच या महाविद्यालयातून शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात नाव कमावल आहे. सदर भेटीच्या माध्यामातून अनेक आजी व माजी विद्यार्थ्यांशी संवाद व्हावा. त्याचबरोबर पालकांशी व विद्यार्थ्यांशी चर्चा व्हावी. त्याचे समस्या समजावून घ्यावे. एकूणच शिक्षणाबाबत जागृती वाढवणे, महाविद्यालयात असणाऱ्या विवीध उपक्रमांची माहिती व्हावी, विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती सुधारावी या हेतूने गृहभेट दौरा आयोजित करण्यात आला. या गृहभेटीत रज्याशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.तोंडे बी.एस. व प्रा. पारधी एस.एस. यांनी सक्रीय सहभाग नोंदविला.



ANNASAHEB AWATE COLLEGE
MANCHAR

ज्ञान संसाधन केंद्र नगरपंचायत मंचर

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग आयोजित दि.१२ फेब्रुवारी २०२६ रोजी अभ्यास भेट घेण्यात आली. सदर भेट ही मंचर नगरपंचायत येथील ज्ञान संसाधन केंद्र मंचर याठिकाणी घेण्यात आली.या वेळी ग्रंथालयाचे ग्रंथपाल थोरात सर यांनी यांनी विद्यार्थांशी संपर्क साधाल त्यावेळी त्यांनी सांगितले की ग्रंथालय हे एक असे ठिकाण आहे जेथे विविध प्रकाराची पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, आणि इतर शैक्षणिक किंवा सांस्कृतिक सामग्री उपलब्ध असते. ग्रंथालयाची प्रमुख उद्दिष्टे म्हणजे ज्ञानाचा प्रसार करणे, वाचनाची प्रेरणा देणे, आणि विद्यार्थांना माहिती मिळवण्यासाठी ज्ञानसंसाधानाचे ठिकाण आहे. तसेच इंटरनेटचा वापर करून आपण विविध लेखकांची पुस्तके, कविता, लेख, संशोधन ग्रंथ कसे ऑनलाइन शोधू शकतो याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानसंशोधनाचे कामकाज कसे चालते याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आले.सदर क्षेत्र भेटीस 38 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



ANNASAHEB AWATE COLLEGE ★MANCHAR★

Head
Department of Political Science
Annasaheb Awate College, Manchar